**<u>स्पे.मु.नं.४१६/२०१३</u>**

श्री. सत्यपाल जैन .....वादी

वि.

श्रीमती जीजाबाई मारुती काठवले, वगैरे ....प्रतिवादी.

## <u>:: आदेश निशाणी ३२ वर ::</u>

प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र.२ याने लेखी उत्तरपत्र दाखल करण्यास झालेला विलंब माफ होऊन मिळण्याकरिता दाखल केला आहे.

**२.** अर्जात असे नमूद करण्यात आले की, दि.२९/११/२०१३ रोजी त्यास दाव्यातील समन्सची बजावणी झाली आहे. परंतु तो मुदतीत लेखी उत्तरपत्र दाखल करु शकला नाही. त्यास लेखी उत्तरपत्र दाखल करण्यास जवळ जवळ पाच महिन्यांचा विलंब झालेला आहे. तो बाहेरगावी असल्यामुळे लेखी उत्तरपत्र मुदतीत दाखल करु शकला नाही. त्यामुळे लेखी उत्तरपत्र दाखल करण्यास झालेला विलंब माफ होऊन मिळण्याची विनंती त्याने केलेली आहे.

**३.** सदर अर्जास निशाणी ३७ वर वादीने लेखी म्हणणे दाखल केले आणि अर्जास हरकत घेतली. त्यात असे नमूद केले की, सदर अर्जात संयुक्तीक कारण नमूद केलेले नाही. म्हणून अर्ज नामंजूर करण्याची विनंती त्याने केलेली आहे.

**४.** अर्जातील तथ्य कथन व प्रतिकथन न्यायालयाने विचारात घेतले. प्रस्तुत अर्ज दि.२४/०७/२०१४ पासून प्रलंबित आहे. प्रतिवादी क्र.२ व त्याचे विद्यमान वकिल सदर अर्जावर युक्तीवाद करण्यास हजर राहिले नाही. अर्जात नमूद केलेल्या कारणास पुष्टी देण्याकरिता प्रतिवादी क्र.२ चे बाजूने शपथपत्र दाखल करण्यात आले. अर्जाचे अवलोकन केले असता दि.२९/११/२०१३ रोजी

दाव्याचे समन्सची बजावणी झाल्याचे दिसून येते आणि प्रस्तुत अर्ज त्याने दि. २४/०७/२०१४ रोजी दाखल केलेला आहे. सबब, विलंब झालेला कालावधी विचारात घेता आणि सदर अर्ज हा मागील अनेक दिवसांपासून प्रलंबित आहे या बाबी विचारात घेता सदर अर्ज प्रतिवादी क्र.२ वर खर्च लादून मंजूर करणे योग्य ठरेल. म्हणून, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## :: आ दे श ::

१. प्रस्तुत अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. लेखी उत्तरपत्र दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो.

३. सदर अर्जाचा खर्च रक्कम रु.२५००/- प्रतिवादी क्र.२ याने द्यावा.

पनवेल.
दिनांक २५/०१/२०१७

( राजेश क. खोमणे)
सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, पनवेल